Website: www.word-pdf-convert.com

के.एम.कामुने, अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचे न्यायालय
अ.प्र.क्र. एसआरव्ही-४३/अंचरवाडी/०४/२००८-०९

श्री. ज्ञानदेव महादु परिहार,
रा. अंचरवाडी ता.चिखली जि. बुलडाणा - - अपिलार्थी

विरुध्द

श्री सुखदेव महादु परिहार,
रा. शेंदूर्णी ता.जामनेर जि. जळगांव
ह.मु. गजानन नगर, चिखली - - प्रतिवादी
ता.चिखली जि.बुलडाणा

अपर जिल्हाधिकारी यांचे न्यायालय सत्यमेव जयते बुलडाणा

आदेश
( पारित दिनांक ३० ऑगस्ट, २०१० )

वि. दिवाणी न्यायालयाच्या दिवाणी दावा क्रमांक ३०२/९२ मधील दिनांक २१/७/९३ च्या निकालानुसार मौजे अंचरवाडी येथील गट नंबर ३८२ मधील अर्ध्या हिस्साची ०.३७ हेक्टर जमिनीचे मुल्य रुपये ३७०००/-, आणि गट नं.४४३ मधील अर्धा हिस्सा १.३६ हेक्टर व गट नंबर ५६५ मधील अर्धा हिस्सा ३.९५ हे. जमीन प्रतिवादी हयांना देणेबाबत तहसिलदार चिखली हयांनी राजस्व प्रकरण क्र. एसआरव्ही-४३/अंचरवाडी/०३/२००५-०६ मधील दिनांक २१.४.२००८ चे आदेशान्वये आदेशीत केले आहे. सदर आदेशामुळे व्यथित होऊन अपिलार्थी हयांनी उपविभागीय अधिकारी, बुलडाणा यांचेकडे अपिल दाखल केले असता प्रकरण क्रमांक एसआरव्ही-४३/अंचरवाडी/०६/२००७-०८ मधील आदेश दिनांक ०६/०२/२००९ अन्वये अपिल नामंजूर करण्यात आलेले आहे. हया आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी सदरचे अपिल दाखल केलेले आहे. त्याचप्रमाणे उपविभागीय अधिकारी बुलडाणा यांच्या दिनांक ०६/०२/२००९ च्या आदेशास स्थगीती देण्याबाबत स्वतंत्र अर्ज दाखल केलेला आहे.

प्रकरण पंजीबध्द करण्यात येऊन प्रतिवादी हयांना नोटिस देण्यात आली आहे.

अपिलार्थीचे वकिलांनी प्रकरणात लेखी युक्तीवाद दाखल केला. त्यात त्यांनी नमूद केले आहे की, वादातील जमीन ही वडिलोपार्जित आहे. अपिलार्थी व प्रतिवादी हे दोघे भाऊ असून त्यांना भाऊ बहिणी नाहीत. वादातील जमिनीचे सन १९८८ मध्ये अपिलार्थीचे नांवे वडिलांनी मृत्युपत्र केले आहे. त्याआधारे अपिलार्थी हयांनी त्यांची मुले शामसुंदर, ज्ञानदेव व इतर दोन हयांचे नावाने जमीन करुन दिली आहे. जमीनी त्यांच्याच ताब्यात आहे. प्रतिवादी हयांचा जमिनीशी कुठलाही कायदेशिर अधिकार नाही. जमिनीबाबत चिखली येथे रे.दि.मु.नं.३०२/९२ आणि २५/२००७ हे न्यायालयात प्रलंबित आहे. या दाव्यांचा अंतिम निकाल होईपावेतो वाटणी बद्दलची कुठलीही कार्यवाही होऊन शकत नाही. त्यामुळे तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांचा निर्णय बेकायदेशिर आहे. तहसिलदार चिखली यांनी जमिनीचे रुपये ३७,०००/- मुल्य ठरविले व कुठल्याही कागदपत्राशिवाय जमिनीच्या प्रतिनुसार जास्त आहे. त्यामुळे प्रिसेप्टची कारवाई स्थगीत करण्यात यावी.

प्रतिवादी हयांना संधी देऊनही त्यांनी युक्तीवाद दाखल केलेला नाही. प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी बंद करण्यात आले.

अपिलार्थी यांनी दाखल केलेला लेखी युक्तीवाद, कनिष्ठ कोर्टाची प्रकरणे व त्यात पारीत केलेले आदेशाचे अवलोकन केले. अपिलार्थी हयांनी त्यांचे युक्तीवादात जमिनी संदर्भात न्यायालयात प्रकरण प्रलंबित असल्याचे नमूद केले आहे. परंतु वि. न्यायालयाने दिलेल्या प्रिसिप्टच्या अनुषंगाने स्थगनादेश दिला किंवा कसे हयाबाबत काहीच कागदपत्रे दाखल केली

Website: www.word-pdf-convert.com

नाहीत.तहसिलदार चिखली हयानी जमिनीचे मुल्य दुय्यम निबधक, चिखली हयांचेकडील प्रमाणित दर तक्त्यानुसार निर्धारित केलेले आहे. वि. दिवाणी न्यायालयाच्या निर्देशानुसार जमिनीच्या वाटण्या निश्चित करुन तहसिलदारांनी आदेश पारीत केलेला असल्याने व उपविभागीय अधिकारी, बुलडाणा यांनी सदर आदेश कायम केल्याने त्यात बदल करण्याची अथवा तो रद्द करण्याची आवश्यकता नाही. सबब प्रकरणात खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

अपिलार्थीचे अपिल नामंजूर करण्यात येत आहे. उपविभागीय अधिकारी बुलडाणा यांनी रा.प्र.क्र. एसआरव्ही-४३/अंचरवाडी/०६/२००७-०८ मध्ये दिनांक ०६/०२/२००९ रोजी पारित केलेला आदेश कायम करण्यात येत आहे.

खर्चाबाबत आदेश नाही.

अपर जिल्हाधिकारी यांचे न्यायालय सत्यमेव जयते बुलडाणा

(के.एम.कामुने)
अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा

**प्रतिलिपी**

१. उपविभागीय अधिकारी बुलडाणा यांना त्यांच्या फाईलावरील रा.प्र.क्र. एसआरव्ही-४३/अंचरवाडी/०६/२००७-०८ सह माहीती करीता रवाना.

२. तहसिलदार चिखली यांना त्यांच्या फाईलावरील रा.प्र.क्र. एसआरव्ही-४३/अंचरवाडी/०३/२००५-०६ सह माहीती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा